# बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या बोगद्यापर्यंतचा मार्ग सुकर

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## घणसोली-शिळफाटा अंतिम मार्ग उद्या पूर्ण होणार

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पात घणसोली आणि शिळफाटा दरम्यानचा अंतिम मार्ग आता पूर्णत्वासाठी सज्ज आहे. एनएटीएम (न्यू ऑस्ट्रियन टनेलिंग मेथड) बोगद्याचा अंतिम टप्पा उद्या, शनिवारी २० सप्टेंबर रोजी पूर्ण होण्याची शक्यता आहे. बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या राज्यातील कामामधील हे महत्त्वाचे यश मानले जाणार आहे.

बुलेट ट्रेन प्रकल्पातील एकमेव बोगदा महामुंबईतील ठाणे खाडीखालून जाणार आहे. बोगद्यासाठी एनएटीएम आणि टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) अशा दोन्ही पद्धतींचा वापर करण्यात येत आहे. २१ किमीपैकी एनएटीएमने पाच किमी आणि टीबीएमने १६ किमीचा बोगदा खणण्याचे काम करण्यात येणार आहे. मुख्य बोगद्यापर्यंत पोहोचण्यासाठी अतिरिक्त बोगद्यासाठी ६ डिसेंबर २०२३ रोजी खोदकाम सुरू करण्यात आले.



### स्थानकांची कामे जोरात

राज्यात मुंबई बुलेट स्थानकासह ठाणे, विरार आणि बोईसर रेल्वे स्थानकांच्या उभारणीचे काम सुरू आहे. मुंबई स्थानकाचे खोदकाम सुरू असून विरार आणि बोईसर स्थानकांचा स्लॅब पूर्ण झाला आहे. अन्य कामे वेगाने सुरू आहेत.

अतिरिक्त बोगद्यासाठी तज्ज्ञांच्या देखरेखीखाली २७ हजार ५१५ किलो स्फोटकांचा वापर करून २१४ नियंत्रित स्फोट करण्यात आले. मुंबईतील घणसोली येथून बोगदा सुरू झाला आहे. वायुवीजनासह अन्य कामांसाठी अतिरिक्त बोगदा महत्त्वाचा ठरणार आहे. याचबरोबर आपत्कालीन स्थितीतही याचा वापर वाहतुकीसाठी करणे शक्य होणार आहे.

बुलेट ट्रेनच्या पॅकेज सी दोन अंतर्गत, मुंबई बुलेट स्थानक ते शिळफाटा बुलेट मार्गिका, ठाणे खाडीखाली दुहेरी भुयारी बुलेट मार्गिका उभारण्यात येणार आहे. यासाठी ॲफकॉन्सला करारबद्ध करण्यात आले आहे. यासाठी सहा हजार ३९३ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.